महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र.मासं/रवका/न.क्र.९/ ३६३१८
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१,धारावी रोड,माटुंगा,
मुंबई ४०० - ०१९
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in

दिनांक : ०८/१२/२०१४

# परिपत्रक

विषय : महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित मधील कर्मचा-यांसाठी **सन २०१५** या कॅलेंडर वर्षासाठी सार्वजनिक सुट्टया जाहीर करणेबाबत.

.....

प्रशासकीय परिपत्रक क्र.१ दिनांक २९.०९.२००५ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, व्यवस्थापकीय संचालक यांनी **सन २०१५** या वर्षासाठी सोबत जोडलेल्या परिशिष्ट 'अ' मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या **२३ सार्वजनिक सुट्टया** महावितरण कंपनीच्या प्रशासकीय कार्यालयांमध्ये काम करणा-या कर्मचा-यांकरिता [कर्मचारी सेवा विनियमातील परिशिष्ट 'क' (APPENDIX-'A') मध्ये समाविष्ट केलेल्या पदांवर काम करणारे कर्मचारी व प्रशासकीय कार्यालयांव्यतिरिक्त इतर ठिकाणी काम करणारे कर्मचारी, तसेच स.सा.आदेश क्र.१२२ (क) दि.२२.०३.१९९० सोबतच्या जोडपत्र 'क' (ANNEXURE —'A') आणि त्यानंतरच्या दि.०३.०४.१९९० व दि.१८.०८.१९९० च्या पुरकपत्रांमध्ये नमूद केलेल्या पदावर काम करणारे कर्मचारी वगळून], जाहीर करण्यास मंजुरी दिली आहे. सदर सार्वजनिक सुट्टया या राज्य शासनाने परक्राम्य संलेख अधिनियम १८८१ (Negotiable Instruments Act 1981) खाली घोषित केलेल्या सार्वजनिक सुट्टया आहेत.

२. कर्मचारी सेवा विनियमाशी संलग्न असलेल्या परिशिष्ट 'क' (APPENDIX-'A') अंतर्गत मोडणा-या कर्मचा-यांचे कामाचे ठिकाण विचारात न घेता त्या कर्मचा-यांना तसेच कंपनीची प्रशासकीय कार्यालये वगळता विद्युत उपकेंद्र अथवा कार्यालये/कार्यस्थाने (वर्क साईटस्/घटक/आस्थापना) या ठिकाणी काम करणा-या तांत्रिक कर्मचा-यांना (ते कोणत्या परिशिष्टाखाली मोडतात हे विचारात न घेता) आणि सामान्य आदेश क्र.१२२ (क) दि.२२.०३.१९९० सोबतच्या जोडपत्र 'क' (ANNEXURE —'A') व त्यासंबंधीची पूरकपत्रे दि.०३.०४.१९९० व दि.१८.०८.१९९० यामध्ये नमूद केलेल्या पदांवर काम करणारे कर्मचारी यांना प्रजासत्ताक दिन व स्वातंत्र्य दिन अगर त्याबद्दलची पर्यायी सुट्टी जमेस धरुन फक्त **६ (सहा) भरपगारी सुट्टया** जाहीर करण्यास व्यवस्थापकीय संचालक यांनी मंजुरी दिली आहे. प्रभारी अधिका-यांची पूर्व मंजूरी घेऊन या कर्मचा-यांना वरील प्रमाणे ६ (सहा) सुट्टया उपभोगता येतील.

३. नाममात्र हजेरीपटावरील आणि कार्यव्ययी आस्थापनेवरील कर्मचा-यांना (नैमित्तिक कामगार वगळून) सन २०१५ यावर्षी प्रजासत्ताक दिन (दि.२६ जानेवारी) व स्वातंत्र्य दिन (दि.१५ ऑगस्ट) या दोन राष्ट्रीय सणांच्या दिवशी तसेच महाराष्ट्र दिन (दि.१ मे) या राजकीय सणाच्या दिवशी भरपगारी सुट्टया मंजूर करण्यात आल्या आहेत. या सुट्टीच्या दिवशी काम करणारे कर्मचारी बदली/पर्यायी सुट्टी मंजूर करुन घेण्यास पात्र राहतील.

४. सदर परिपत्रक कंपनीच्या R-APDRP Portal वर उपलब्ध करण्यात आले आहे.

(संदेश हाके)
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

सहपत्रे : सार्वजनिक सुट्टयांची सूची
(परिशिष्ट - 'अ')

*D:\O&M\Holiday-2015.doc*

# परिशिष्ट 'अ'
# सार्वजनिक सुट्ट्या - २०१५
## (अ)

| अ.क्र. | सुट्टीचा दिवस | इंग्रजी तारीख | वार |
|---|---|---|---|
| १. | प्रजासत्ताक दिन | २६ जानेवारी, २०१५ | सोमवार |
| २. | महाशिवरात्री | १७ फेब्रुवारी, २०१५ | मंगळवार |
| ३. | छत्रपती शिवाजी महाराज जयंती | १९ फेब्रुवारी, २०१५ | गुरूवार |
| ४. | होळी (२ रा दिवस) | ०६ मार्च, २०१५ | शुक्रवार |
| ५. | गुढी पाडवा | २१ मार्च, २०१५ | शनिवार |
| ६. | महावीर जयंती | ०२ एप्रिल, २०१५ | गुरुवार |
| ७. | गुड फ्रायडे | ०३ एप्रिल, २०१५ | शुक्रवार |
| ८. | डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती | १४ एप्रिल, २०१५ | मंगळवार |
| ९. | महाराष्ट्र दिन | ०१ मे, २०१५ | शुक्रवार |
| १०. | बुध्द पौर्णिमा | ०४ मे, २०१५ | सोमवार |
| ११. | रमझान ईद (इद-उल-फितर) (शव्वल-१) | १८ जुलै, २०१५ | शनिवार |
| १२. | स्वातंत्र्य दिन | १५ ऑगस्ट, २०१५ | शनिवार |
| १३. | पारशी नववर्ष दिन (शहेनशाही) | १८ ऑगस्ट, २०१५ | मंगळवार |
| १४. | गणेश चतुर्थी | १७ सप्टेंबर, २०१५ | गुरुवार |
| १५. | बकरी ईद (इद-उल-झुआ) | २५ सप्टेंबर, २०१५ | शुक्रवार |
| १६. | महात्मा गांधी जयंती | ०२ ऑक्टोबर, २०१५ | शुक्रवार |
| १७. | दसरा | २२ ऑक्टोबर, २०१५ | गुरुवार |
| १८. | दिवाळी अमावस्या (लक्ष्मीपुजन) | ११ नोव्हेंबर, २०१५ | बुधवार |
| १९. | दिवाळी (बलिप्रतिपदा) | १२ नोव्हेंबर, २०१५ | गुरुवार |
| २०. | भाऊबीज | १३ नोव्हेंबर,२०१५ | शुक्रवार |
| २१. | गुरु नानक जयंती | २५ नोव्हेंबर, २०१५ | बुधवार |
| २२ | ईद-ए-मिलाद * | २४ डिसेंबर, २०१५ | गुरुवार |
| २३. | ख्रिसमस | २५ डिसेंबर, २०१५ | शुक्रवार |

## (ब)

खालील सण महिन्याच्या **चौथ्या शनिवारी व रविवारी** येत असल्यामुळे त्या दिवशी सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात आलेली नाही.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | ईद-ए-मिलाद * | ०४ जानेवारी, २०१५ | रविवार |
| २. | रामनवमी | २८ मार्च, २०१५ | चौथा शनिवार |
| ३. | मोहरम | २४ ऑक्टोबर २०१५ | चौथा शनिवार |

* ईद-ए-मिलाद (प्रेषित मोहम्मद यांचा जन्मदिवस) सन २०१५ मध्ये दोन वेळा येत आहे.

*D:\O&M\Holiday-2015.doc*